## गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १४९ वा ● बुधवार १८ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 149 | Date : 18/10/2023 | blow :Wednesday |Page 4 |Price 4


## भारत २०४० पर्यंत चंद्रावर मानव पाठवणार : पंतप्रधान मोदी यांची घोषणा

नवी दिल्ली : आगामी वर्षात इस्रोच्या साहाय्याने भारत २०३५ पर्यंत भारतीय अंतराळ स्थानक उभारणार असून, २०४० पर्यंत चंद्रावर मानव पाठवणार असल्याची घोषणा मंगळवारी घेतलेल्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. चांद्रयान-३ आणि सूर्यमोहिमेच्या यशानंतर 'गगनयान' प्रक्षेपणाठी भारत सज्ज झाला आहे. शनिवारी, २१ ऑक्टोबरला गगनयानाचे प्रक्षेपण होणार आहे. या मोहिमेसंदर्भात आज पंतप्रधान कार्यालयात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी भविष्यातील भारतीय अंतराळ मोहिमांचे वेळापत्रक जाहीर केले. भारताची आगामी गगनयान मोहिमेच्या प्रगतीचे मूल्यांकन तसेच भारताच्या अंतराळ संशोधन प्रयत्नांच्या भविष्याची रूपरेषा तयार करण्यासाठी आज मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. पंतप्रधान कार्यालयात झालेल्या या बैठकीत पंतप्रधानांनी



भविष्यातील महत्त्वपूर्ण अंतराळ मोहिमांची घोषणा केली. मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चांद्रयान-३, आदित्य-एल१ सूर्यमोहिमेच्या यशानंतर आता गगनयानासंदर्भात चर्चा झाली. तसेच भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या माध्यमातून भारत भविष्यात शुक्र आणि मंगळावरील मोहिमा हाती घेणार आहे. तसेच २०३५ पर्यंत भारतीय अंतराळ स्थानक उभारले जाणार असून, २०४० पर्यंत चंद्रावर माणूस पाठवणार असल्याचेही मोदी यांनी या बैठकीत सांगितले. पंतप्रधान मोदींनी भारताच्या अंतराळ संशोधन प्रयत्नांच्या भविष्याविषयीच्या बैठकीत भारतीय शास्त्रज्ञांना व्हीनस ऑर्बिटर मिशन आणि मार्स लँडर यांचा समावेश असलेल्या आंतरग्रहीय मोहिमांच्या दिशेने काम करण्याचे आवाहन केले. तसेच भारताने आता नवीन आणि महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करावीत असे निर्देश देखील या बैठकीत मोदींनी दिले आहेत. इस्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, गगनयानसाठी २० महत्त्वाच्या चाचण्या केल्या जातील ज्यामध्ये ३ मानवविरहित मिशनच्या चाचण्यांचा समावेश आहे.

# आता ही शेवटची संधी

## सर्वोच्च न्यायालयाचे विधानसभा अध्यक्षांवर ताशेरे

मुंबई : तुम्ही सादर केलेल्या वेळापत्रकावर आम्ही समाधानी नाही. सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी आम्हाला आश्वस्त केलंय की दसऱ्याच्या सुट्टीदरम्यान ते स्वत: विधानसभा अध्यक्षांसमवेत बसून वेळापत्रक तयार करतील. यासाठी ही अंतिम संधी आम्ही देत आहोत. या प्रकरणाची पुढची सुनावणी ३० ऑक्टोबर रोजी होईल, असे आदेश न्यायालयाने यावेळी दिला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी यावेळी विधानसभा अध्यक्षांच्या वतीने बाजू मांडताना अतिरिक्त कालावधीची मागणी केली. आज आम्हाला वेळापत्रक देणं शक्य होणार नाही.



कारण मध्यंतरीच्या काळात सुट्ट्यांमुळे आम्हाला ते शक्य झालं नाही. आता आमची न्यायालयाला विनंती आहे की त्यांनी हे वेळापत्रक सादर करण्यासाठी आम्हाला अतिरिक्त वेळ द्यावा. २८ ऑक्टोबरनंतर ही सुनावणी ठेवावी, असा युक्तिवाद तुषार मेहतांकडून करण्यात आला. त्याला शिवसेना व राष्ट्रवादीकडून बाजू मांडणारे ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल यांनी तीव्र आक्षेप घेतला. यानंतर न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना परखड शब्दांत सुनावलं.

## ६९ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्रदान

नवी दिल्ली : ६९ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आले. 'एकदा काय झालं' या चित्रपटाला सर्वोत्तम मराठी चित्रपटाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नर्गिस दत्त राष्ट्रीय एकात्मता श्रेणीतील पुरस्कार, द कश्मीर फाइल्स या चित्रपटास, तर सामाजिक विषयावरील सर्वोत्कृष्ट चित्रपटांच्या श्रेणीत थ्री टू वन या मराठी सिनेमाला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.विज्ञान भवनात ६९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरूगन, माहिती व प्रसारण विभागाचे सचिव अपूर्व चंद्रा



आणि पर्यवेक्षक समितीचे अध्यक्ष मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. आज प्रदान झालेले पुरस्कार वर्ष २०२१ चे आहेत. कोरोना महामारीमुळे वर्ष २०२१ मधील पुरस्कारांचे वितरण आज करण्यात आले. 'एकदा काय झालं' या चित्रपटाला सर्वोत्तम मराठी चित्रपटाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यासोबतच 'गोदावरी', 'थ्री टू वन', 'रेखा', 'या मराठी चित्रपटांनाही विविध श्रेणींमध्ये सन्मानित करण्यात आले. फिचर फिल्ममध्ये विविध ३२ श्रेणीत पुरस्कार पुरस्कार प्रदान करण्यात आले, तर नॉन फिचर फिल्ममध्ये विविध २४ श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

**हिंदीमधील सर्वोत्कृष्ट सिनेमा**

**'सरदार उधम'** हिंदीमधील सर्वोत्कृष्ट सिनेमा 'सरदार उधम' ठरला. ६९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये, 'सरदार उधम' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट, सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफी, सर्वोत्कृष्ट कॉस्च्युम डिझायनर, सर्वोत्कृष्ट निर्मिती डिझाइन आणि सर्वोत्कृष्ट ऑडिओग्राफी: री-रेकॉर्डिंग या श्रेणींत राष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार 'पुष्पा' या तेलुगु चित्रपटासाठी अल्लू अर्जुन यांना प्रदान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार यावेळी दोन अभिनेत्रींना प्रदान करण्यात आला. 'गंगूबाई काठियावाडी' या चित्रपटासाठी आलिया भट, तर 'मिमी' या चित्रपटसाठी क्रिती सेनॉन यांना सर्वोत्कृष्ट **। पान २ वर**

## तामिळनाडूत दोन फटाक्यांचा कारखान्यांत स्फोट, ११ जणांचा मृत्यू

तामिळनाडू : तामिळनाडूमध्ये दोन वेगवेगळ्या फटाक्यांचा कारखान्यांत स्फोट झाल्याने ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील रंगापालयम आणि किचिन्यकनपट्टी येथील दोन वेगवेगळ्या फटाक्यांच्या कारखान्यांमध्ये मंगळवार या दुर्घटना घडल्या आहेत. या दुर्घटनेत काही जण जखमी झाल्याची माहिती समोर येत असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पोलीस, अग्निशमन आणि बचाव कर्मचारी आणि स्थानिक लोकांनी मिळून आग विझवण्याचा आणि पीडितांना वाचवण्याचा प्रयत्न केला. पीटीआयशी बोलताना पोलिसांनी सांगितलं की, शिवकाशीच्या फटाक्यांच्या कारखान्यात अचानक झालेल्या स्फोटानंतर घटनास्थळावरून सापडलेल्या मृतदेहांची ओळख अद्याप पटलेली नाही.

पहिली दुर्घटना रंगपालयम येथे घडली. रंगपालयमच्या फटाका कारखान्यात स्फोट झाल्यानंतर आग लागल्याचं पोलिसांनी सांगितलं. पोलिस, अग्निशमन दल आणि बचाव कर्मचार्यांनी स्थानिकांसह आग विझवली. येथून सात मृतदेह बाहेर काढण्यात आले अशसून त्यांची अद्याप ओळख पटलेली नाही. दुर्घटनेत मृत्यू झालेले लोक येथे काम करणारे मजूर असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातात आणखी तीन **। पान २ वर**

## महावितरणने अक्कलकोट रोड व चिंचोली एमआयडीसीचा वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



सोलापूर/प्रतिनिधीः अक्कलकोट रोड व चिंचोली एमआयडीसी मध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योग आहेत. उद्योगांना नियमित वीजपुरवठा होणे आवश्यक आहे. उपरोक्त दोन्ही एमआयडीसी मध्ये उद्योजकांचा प्रतिनिधी घेऊन वीज पुरवठा कोठे कोठे खंडित होतो, तसेच रोहित्र व्यवस्थित आहेत का? याबाबत तपासणी करावी. व पुढील काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता महावितरण ने घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती च्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महापालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता आर. एम. परदेशी, महावितरण चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता ग्रामीण राजेश मदने, एमआयडीसीचे वसुंधरा जाधव, ए. डी. मगर, उद्योजकांचे प्रतिनिधी निलेश शहा, श्रीकांत अंबुरे, राम रेड्डी, रमेश डाकलिया, राजू राठी, रामेश्वरी गायकवाड आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, अक्कलकोट रोड एमआयडीसी मधील उद्योजकांचे वीज खंडित होणे, ट्रीप होणे रोहित्रवर अतिरिक्त भार असणे त्यामुळे मशिनरी खराब होत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्या अनुषंगाने वीज वितरण कंपनीने अक्कलकोट एमआयडीसी उद्योजकांचा प्रतिनिधी सोबत घेऊन तपासणी करावी व सुरळीत वीज पुरवठा करावा. त्याचप्रमाणे एमआयडीसी चिंचोली मध्ये जी याच पद्धतीने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये रस्ते, स्ट्रीट लाईट पाणीपुरवठा ड्रेनेज व्यवस्था महापालिकेने देणे आवश्यक आहे. परंतु महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने राष्ट्र औद्योगिक विकास संस्थेने ही कामे करावी यासाठी महापालिकेने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे, त्या अनुषंगाने एमआयडीसीला पत्र पाठवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांना दिले. तसेच महापालिकेने अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरासाठी जिल्हा नियोजन समिती मधून फायर स्टेशन साठी एक कोटी २५ लाखाचा प्रस्ताव सादर केलेला आहे, त्या प्रस्तावाला मान्यता देण्यात येईल. प्रमाणे फायर स्टेशन साठी आवश्यक असलेले वाहन खरेदीसाठी जवळपास एक ते दीड कोटीचा निधी आवश्यक असल्याने **। पान २ वर**






## जिल्हा परिषदेच्या शाळांना ग्रंथालयासाठी पुस्तके उपलब्ध करून देणार : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांना ग्रंथालय उपलब्ध नाही अशा सर्व शाळांची यादी शिक्षण विभागाने तयार करून ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या सर्व शाळांना ग्रंथालयासाठी किमान शंभर पुस्तके तात्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ व २३-२४ चा जिल्हा परिषद यंत्रणांच्या विविध विभागांच्या आढावा प्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, महसूल उप जिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, सहायक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे व अन्य अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेमध्ये एक चांगले ग्रंथालय असणे आवश्यक आहे त्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी आवश्यक विविध प्रकारचे पुस्तके असावीत. यासाठी शिक्षण विभागाने शाळेच्या मुख्याध्यापकांना तात्काळ किमान शंभर पुस्तकाची यादी तयार करण्यास कळवावे व ती सर्व पुस्तके आपण स्वतः तात्काळ खरेदी करून देणार असून प्रत्येक शाळेत ग्रंथालय सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ती पुस्तके शाळेत तसेच वाचण्यासाठी घरी रोटेशन पद्धतीने घेऊन जाण्याची परवानगी द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

**। पान २ वर**

## ✽ सुविचार ✽

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### इस्त्राइलच्या पाठीशी उभे...

अलीकडेच सकाळ उजाडली ती भयानक हल्ल्यांची वार्ता घेऊनच. योम किप्पूरच्या लढाईत विजय मिळवल्याबद्दल रंगारंग कार्यक्रमात व्यस्त असलेल्या इस्त्राइलींवर हमासकडून अत्यंत निर्घृण असा हल्ला चढवण्यात आला. यामुळे हमासची निंदा करायचे सोडून काही मुस्लीम मतांचा अनुनय करणारे पक्ष चक्क हमासची बाजू घेऊन उभे राहिले आहेत. अर्थात याचा काहीही परिणाम इस्त्राइलवर होणार नाही. ठाकरे गटातील काही नेत्यांनी जरी हमासच्या बाजूने बांग दिली असली तरीही त्यांना मुस्लिमांची मते मिळतील, याची काही खात्री नाही. सेव्ह गाजावाले आता अकलेचे तारे तोडत असले तरीही इस्त्राइल हमासच्या या कृत्याबद्दल त्याला शिक्षा घडवल्याशिवाय राहणार नाही आणि त्याने ते कार्य सुरूही केले आहे. हमासवर अत्यंत चोख असे हल्ले चढवण्यात आले आहेत. यामध्ये कित्येक दहशतवाद्यांना ठार मारण्यात आले आहे. इस्त्राइलने तर हमासचे म्हणजे गाझा पट्टीचे अन्न, पाणी आणि इतरही मदत तोडणार असल्याचे जाहीर केले आहे. गाझा पट्टी हा चिंचोळा प्रदेश असून तेथे लोकसंख्या मात्र लाखो आहे. त्यामुळे लहानशा हल्ल्यातही ठार झालेल्यांची संख्या प्रचंड असते. तेच आता चालू आहे. इस्त्राइलने भीषण असे हल्ले चढवण्यास सुरुवात केली असून त्याची परिणती हमासच्या संपूर्ण नष्ट होण्यातच होणार आहे. कारण इस्त्राइल म्हणजे भारत नव्हे. पण पश्चिम आशियात पुन्हा अशांततेचे पर्व सुरू झाले आहे आणि यात कुणाची आहुती पडणार, हे सांगता येणार नाही. सारे जग यामुळे धास्तावले आहे. युध्द तिकडे चालू आहे, मग आपल्याला काय, ही प्रवृत्ती आपल्याकडे खूप आहे. पण याचे परिणाम साऱ्या जगावर होणार आहेत आणि आपल्यालाही याचा फटका बसणार आहे. युध्दामुळे महागाई प्रचंड वाढणार आहे आणि आपली अर्थव्यवस्था जी अगोदरच संकटातून चालली आहे, तिला आणखी खाईत जावे लागणार आहे. पश्चिम आशिया हा प्रांत कधीच शांत नव्हता. कारण तेथे मुस्लीम राष्ट्रे इस्त्राइलला हरवण्यासाठी जंग जंग पछाडत. पण इस्त्राइल अमेरिकेच्या मदतीने पुरून उरेल. अजूनही काही विचारवंत, संपादक वगैरे मंडळी इस्त्राइलवर टीका करणे हा आपला धर्म समजतात. तसे आताही चालू आहेच. पण भारताला इस्त्राइलचीच बाजू घ्यावी लागणार आहे. या विचारवंतांना खूश करण्यासाठी भारताने जर हमासला पाठिंबा दिला, तर उद्या हमास भारतात घुसून येथेही असाच उच्छाद मांडतील, तेव्हा भारताने खंबीरपणे इस्त्राइलच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

## पंगत लागली उठायला.. आणि हे चालले जेवायला..?

### आरक्षणाचे तीन तेरा..!

**भाग १**

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी छत्रपती शाहू राजे यांनी कोल्हापूर संस्थानात मागास वर्गीय आणि मराठा यांना ही शिक्षण आणि नौकरी यात आरक्षण ठेवले होते. याचे कारण अनेक कचेऱ्यात ज्या सगळ्या नौकरी होत्या त्या फक्त ब्राम्हण वर्गाच्या हातात होत्या आणि बहुजन समाज शिक्षणापासून कोसो दूर होता

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीमाई सावित्री बाई फुले यांनी सुरू केलेले बहुजनांसाठी चे शिक्षण सर्व दूर पसरले नव्हते किंवा त्याची महती लोकांना कळली नव्हती याचे कारण गाव खेड्यातील पारंपारिक जीवन पद्धतीत होते. आणि कारागिरी किंवा शेती साठी शिक्षणाची पारंपारिक पद्धत उपयोगी ठरतं होती म्हणजे चर्मकाराचा मुलगा कातड्याशी खेळत आणि शेतकऱ्याचा मुलगा औत बैलाशी खेळत आपोआप ते कौश्यल्य संपादित करत होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि शैक्षणिक चळवळ झपाट्याने वाढू लागली हळू हळू विज्ञान आणि गणिती क्षेत्रात प्रगती झाली. जग आधुनिक झाले, तसतश्या लोकांच्या राहणीमान आणि जीवनात फरक पडत गेला

मी याच्या फार तपशीलात जात नाही , याचे कारण मूळ लेखाचा विषय कांदबरी बनून जाईल. या काळात पाहिले तर समाजाचे दोन विभाग स्पष्ट होतात. एक आहे रे वर्ग..

म्हणजे ज्यांच्या कडे त्या वेळच्या कृषी आधारित अर्थ व्यवस्थेत आर्थिक कणा असलेली शेती ज्यांच्या कडे आहे व त्या व्यवस्थेच्या भोवती फिरणारी उद्योग व्यवस्था ज्यांच्या हातात आहे तो गावकुसातील समाज आणि दुसरा नाही रे समाज जो गावकुसा बाहेर आहे, ज्याचे कडे शेती नाही, शेती पूरक इतर व्यवसाय नाहीत जसे (घानी तून तेल काढणे ) वतनाच्या थोड्या जमिनी आधारे वरच्या, खालच्या, मधल्या आळीचे सगळेच ५-५० मालक असलेली कोरडवाहू जमीन त्याचे ही पलीकडे असलेला ना गाव ना कुस असलेला भटका, माळावर शिकार करून वेलाच्या टोपल्या विणून देव डोक्यावर घेऊन आणि संसार घोड्या गाढवावर लादून पाला पालात संसार थटनारा भटका विमुक्त आणि त्याच्या ही पलीकडे जंगलात राहणारा जंगली जुडी बुट्टी , हिरडे , बेहडे, मोहाची फुले , ताड माड याची दारू बनवून पिणारे आणि उंदरे, रान बोके, पासून थेट लाल मुंग्याची चटणी पक्वान्न म्हणून खाणारे आदिवासी..

स्वातंत्र्या नंतर किमान याही लोकांचे जीवनमान उंचवावे म्हणून आरक्षण नितीचा अवलंब करण्यात आला मुळात शेकडो कोटी लोकसंख्या असलेला हा देश कुणाच्या वाट्याला किती येणार? गावकुसाबाहेर राहणाऱ्या कांहीं लोकांच्या सुधारणा झाल्या, कांहीं घरे निर्माण झाली. पण मोठ्या प्रमाणावर हा वर्ग आज ही अंगमेहनत आणि साफ सफाई चे काम करूनच उपजीविका करत आहे हे वास्तव आज ही दडवले जाते. भारतीय समाज हा न्यायप्रिय समाज नाही तर तो जाती प्रिय आणि जातिसंघटित समाज आहे. म्हणून तो ब्राम्हण असतो तो मराठा असतो तो महार असतो किंवा पारधी असतो तो धनगर असतो.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे हिंदू धर्म हा जात कोंडाळे आहे, बटाटे पोत्यात भरल्या सारखी त्याची स्थिती आहे, प्रत्येक जातीचे अस्तित्व, प्रेरणा, आदर्श , रीती , रीवाज भिन्न म्हणून इथे जात संघटित होते. जातीचा माणूस जात डोक्यावर घेते ही जात भाषा जातीय हिताची भाषा बोलता आले की ते पुरेसे ठरते

सगळ्या भौतिक साधन संपत्ती गाव , तालुके , जिल्हे आणि राज्य ताब्यात असून ही ते दुःखी आणि ज्यांच्या हातात कोणतीच सत्ता, कारखानदारी, शेती नाही ते फार सुखी कारण त्यांना आरक्षण आहे. शिक्षणात सवलत आहे ,आणि बॅकलॉग भरला गेला नाही तरी नौकरीत आरक्षण आहे म्हणून ते सुखी.. सगळ्या अर्थकारणाच्या चाव्या स्वतः चे कणवटी ला लाऊन आणि आर्थिक महामंडळे निर्माण करून तटपूंजी सबसिडी देऊन बँकात हेलपाटे घालून ५-५० हजाराचे कर्ज ही मिळण्यास अनंत अडचणी चां सामना करावा लागणारा महार , मांग , होलार हा सुखी..? हे छिनालपन फक्त याच देशात चालू शकते याचे कारण या व्यवस्थेतील लोक दूट्टपी आहेत, त्यांच्या भावना प्रामाणिक नाहीत. नाही रे वर्गाने कसलीच भौतिक प्रगती करू नये अशी त्यांची मनोधारणा आहे, त्यांनी फक्त हलकी कामे करावी, शहरात गटारी चे मेन होल उघडुन त्यात त्यांनीच उतरावे, गावाच्या साफ सफाईची कामे करावीत असे त्यांना मनोमन वाटते. आरक्षणाला विरोध करायचा म्हणून ते गुणवत्ताचे तुणतुणे वाजवतात आणि तोंडाला येईल असे मोघम बोलतात.. म्हणे ९०%मार्क घेऊन ही ते नौकरी पासून वंचित आणि ६०%घेऊन ही आरक्षण वाले नौकरित.. यात खरोखर तथ्य आहे काय?

आज कोणत्याही व्यवसायिक शिक्षणा पासून कॉलेज एडमिशन पर्यंत क्लोज ची टक्के वारी पहा म्हणजे समजेल की ते किती टक्क्या ला क्लोज होते ? परीक्षा घेणारे हे , पेपर ही फोडणारे हेच, आणि भरती करताना मुलाखती घेणारे ही तेच, नौकर भरती करताना एस सी /एस टी चे जागा असताना ही आणि त्या साठी उमेदवार उपलब्ध असताना ही त्या जागा मोकळ्या ठेऊन उमेदवार मिळाला नाही असे दर्शवून त्या जागी स्व जातीचे उमेदवार तात्पुरते भरती करून नंतर नियमित करणारे हे लोक न्यायी आहेत काय? ते इतक्या वर थांबले नाहीत, हे आरक्षण संपवण्याचे पाऊल त्यांनी कधीच उचलले आहे ते सर्व सार्वजनिक , सरकारी आस्थपनाचे खाजगीकरण करून

त्यांनी शिक्षणाचे ही खासगी करण केले. आत्ता तर जिल्हा परिषद शाळा ही यातून सुटलेल्या नाहीत मग हे कॉन्ट्रॅक्टर नफ्यासाठी शाळा चालवणार, बसेस चालवणार, वीज वितरित करणार, रस्ते बांधणार, धरणाच्या पाण्याचे नियोजन करणार यात किती दलीत ? किती आदिवासी ? किती भटके विमुक्त कॉन्ट्रॅक्टर आहेत? या वर्गा कडे असलेली जमीन किती? साखर कारखाने , दूध संघ, शाळा, कॉलेज अशी आस्थापने किती?

याचा एकदा तरी हिशोब मांडा..

दोष शोषण कर्त्यांचा नाही आमचा आहे आम्ही गांडु आहोत, आमचे रक्त उसळत नाही, आम्ही बोलतच नाही, मुकाटपणे बघत राहतो. आमच्या पोटातील अन्न हीच आमची चरबी झाली आहे ,

ते किती जमले? त्यांचे दुःख किती मोठे त्यांची गरिबी किती मोठी? शेती उध्वस्त झाली, आत्महत्या केली, कर्ज झाले आत्महत्या केली, आरक्षण मिळाले नाही आत्महत्या केली आम्ही मरतच नाही.. दुष्काळ पडला तरी रान भाज्या शिजवून आम्ही खाणार, कोंबडीचे सोलून टाकलेले भोत गरम पाण्यात टाकून त्याची पिसे उपसून मटण म्हणून खाणार, शेतातून उंदीर,घोरपडी, ससे आणि नदी नाल्यातील चींगळया मासे पकडून आम्ही खाणार, रेशनचा गहू आणि तांदूळ आणि आनंदाचा शिधा ही आमची दिवाळी..

अरे जरा लाजा..

थोडी तरी मनाची शरम बाळगा..

कोट्यवधी जनतेच्या हातात तुम्ही धतुरा दिला आणि तुमचे खरे शोषणकर्ते जे राजकारणात आहेत त्यांची शेती , त्यांची कारखानदारी, त्यांच्या शाळा, त्यांच्या गाड्या, त्यांचे बंगले, त्यांचे राजवाडे एकदा नजरे खाली घाला.. कोण खाजगीकरण करत आहेत ते बघा..

टोल गोळा कोण करत आहे ते बघा..

कुणाच्या खाणी आहेत ते बघा.. आरक्षणाची पंगत त्यांनी केंव्हाच उठवली आहे.. **क्रमश :**

**पान १ वरुन**

### तामिळनाडूत दोन फटाक्यांचा

जण जखमी झाले होते, नंतर उपचारादरम्यान तिघांचाही मृत्यू झाला.दुसरी दुर्घटना किचनायकनपट्टी गावातील फटाक्यांच्या कारखान्यात घडली. या दुर्घटनेच एकाचा मृत्यू झाला, तर दोन महिला मजूर बचावल्या. त्यांना उपचारासाठी श्रीविल्लीपुत्तूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी तीन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे, तर जखमींना प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी दुर्घटनेवर शोक व्यक्त करत मृतांच्या नातेवाईकांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

### जिल्हा परिषदेच्या शाळांना

जिल्हा परिषदेच्या ३५ शाळा महापालिकेच्या हद्दपार भागात आलेले आहेत त्या सर्व शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक असल्याने नियोजन समितीमध्ये तात्काळ उपलब्ध करण्यात येईल असे पालकमंत्री पाटील यांनी सांगून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील किमान दोन भाषा एकूण २२ शाळांमध्ये दहा प्रकारचे विविध कार्यक्रम आयोजित करावे त्यासाठी आवश्यक असलेला प्रति शाळा दीड ते दोन लाखाचा निधी तसेच जिल्ह्याच्या प्रत्येक शाळेत ,स्वच्छतागृह व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर फंडातून उपलब्ध केला जाईल.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ च्या कामांचे कार्यारंभ आदेश माहे ऑक्टोबर २०२३ अखेर तर सन २०२३-२४ ज्या कामांचे कार्यारंभ आदेश डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत देण्यात यावेत. माहे जानेवारी २०२४ अखेर लोकसभेसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे तर नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मध्ये ग्रामपंचायत निवडणुका होत आहेत. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी त्यांना मंजूर असलेल्या निधीतून कामांची प्रक्रिया पूर्ण करून घेणे आवश्यक असल्याने संबंधित यंत्रणांनी याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री श्री. पाटील यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या प्रत्येक यंत्रणेने नियमित कामाव्यतिरिक्त नियोजन समितीच्या निधीमधून आपल्या विभागांतर्गत विकासाची कामे कशा पद्धतीने करावयाची याचा स्वतंत्र कृती आराखडा असला पाहिजे. शासकीय यंत्रणेने प्रस्तावित केलेली कामे गतीने विहित कालावधीत पूर्ण केल्यास त्याचा लाभ सर्वसामान्य लाभार्थ्यांना मिळतो, त्यामुळे त्याचा फायदाही शासनाला होत असतो. त्यासाठी प्रत्येक विभागाने दक्षता घेऊन कामे करावीत, असे निर्देश पालकमंत्री पाटील यांनी दिले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ माहे मार्च २०२३आखेर झालेल्या खर्चाची माहिती बैठकीत सादर केली. यामध्ये सर्वसाधारण योजना खर्च ५२६ कोटी ८१ लाख, अनुसूचित जाती उपायोजना खर्च १५० कोटी ६५ लाख, आदिवासी क्षेत्राबाहेर उपाय योजना खर्च ४ कोटी २१ लाख असा एकूण ९९.८५% निधी खर्च झाल्याची माहिती दिली. यावेळी जिल्हा परिषदेच्या सर्व यंत्रणांनी जिल्हा नियोजन समितीतून मिळालेल्या निधी अंतर्गत प्रास्तावित कामांची माहिती सादर केली. त्यामध्ये पशुसंवर्धन, आरोग्य, समाज कल्याण, सार्वजनिक बांधकाम, ग्रामपंचायत, महिला व बालविकास आदी विभागाची माहिती देण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी जिल्हा परिषद जिल्हा परिषद जिल्हा वार्षिक योजना सन २०२२- २३ व २३ -२४ अंतर्गत मंजूर असलेला सर्व निधी विहित कालावधीत १००% खर्च करेल याबाबत आश्वासित केले. प्रारंभी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याचे कॉफी टेबल बुक देऊन स्वागत करण्यात आले.

### महावितरणने अक्कलकोट रोड ..

हा निधी विशेष बाब म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांनी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरात महापालिकेने वेळच्यावेळी कचरा उचलण्यासाठी घंटागाडी पाठवावी. त्याचप्रमाणे दोन्ही एमआयडीसी साठी सोलापूर शहरातून कामगारांना ये जा करण्यासाठी महापालिकेने सिटी बस सेवा उद्योजकाची चर्चा करून त्यांनी ठरवून दिलेल्या वेळेत उपलब्ध करून द्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केल्या. या दोन्हीही एमआयडीसी साठी अंतर्गत स्ते, स्ट्रीट लाईट व ड्रेनेज सिस्टीम साठी कामे सुचवण्यासाठी सुचवणे व प्रस्ताव सादर करण्यासाठी एक समिती गठीत करावी असेही त्यांनी सांगितले. यावेळी अक्कलकोट रोड व चिंचोली एमआयडीसी मधील अनेक उद्योजक बैठकीस उपस्थित होते त्यांनी त्यांचे उद्योग व एमआयडीसी परिसरातील विविध समस्येच्या अनुषंगाने आपली मते मांडली व त्या समस्या प्रशासनाने सोडवण्याची मागणी केली. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते यांनी जिल्हा उद्योग मित्र समितीच्या मागील इतिवृत्ताची माहिती दिली.तसेच या सभेच्या अनुषंगाने विविध विषयाची मांडणी केली. यावेळी त्यांनी राज्य शासनाने उद्योग भवन मंजूर केले असून रत्नागिरी नंतर सोलापूरला उद्योग भवन उभारण्यास मंजुरी दिल्याची माहिती दिली. तसेच शासनाने सुरू केलेले व नवउद्योगांच्या अडचणी दूर करणारे एक खिडकी या पद्धतीने कार्यरत असणारे मैत्री प विषयी माहिती दिली.

### ६९ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार राष्ट्रपती

अभिनेत्री म्हणून सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट सहअभिनेत्याचा पुरस्कार 'मिमी' या हिंदी सिनेमासाठी पंकज त्रिपाठी तर सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार पल्लवी जोशी यांना 'द कश्मीर फाइल्स' या चित्रपटासाठी प्रदान करण्यात आला.

सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म पुरस्कार 'रॉकेट्री : द नांबी इफेक्ट' अंतराळ वैज्ञानिकावर आधारित चित्रपटाला प्रदान करण्यात आला. तर, शेरशाह चित्रपटाला विशेष ज्युरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संपूर्ण मनोरंजन या श्रेणीतील पुरस्कार 'आरआरआर' या तेलुगु सिनेमाला पुरस्कार प्रदान करण्यात आला. नर्गिस दत्त राष्ट्रीय एकात्मता श्रेणीतील पुरस्कार 'द कश्मीर फाइल्स' या हिंदी सिनेमाला सन्मानित करण्यात आले.

**एकदा काय झालं – सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा बहुमान**

प्रादेशिक भाषांमधील सर्वोत्कृष्ट चित्रपटांना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. यात मराठी भाषेसाठी 'एकदा काय झालं' या चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले असून रजत कमल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वडील आणि मुलाच्या नात्यातील नितांत सुंदर आणि हळवा प्रवास चित्रपटातून दाखविण्यात आलेला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक सलील कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप रजत कमल आणि १ लाख रूपये रोख आहे.

**निखिल महाजन यांना 'गोदावरी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार**

'गोदावरी' या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या चित्रपटाचे दिग्दर्शक व आघाडीचे सिने-दिग्दर्शक निखिल महाजन यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप स्वर्ण कमळ, २ लाख ५० हजार रोख असे आहे. याआधी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्येही 'गोदावरी' सिनेमाला गौरवण्यात आले आहे. 'गोदावरी' हा कौटुंबिक सिनेमा आहे. प्रत्येक कुटुंबाला जोडणारा असा हा सिनेमा आहे. नाशिकमध्ये राहणाऱ्या निशिकांतच्या हसत्या खेळत्या कुटुंबातील चढउतार तसेच परंपरा, रूढी आणि भावना यांचे सुंदर मिश्रण 'गोदावरी'मध्ये दाखवण्यात आले आहे. नाशकातील गोदावरी नदी हा या सिनेमाचा मुख्य दुवा आहे.

**नॉनफिचर मध्येही मराठी चित्रपटांची मोहर**

नॉनफिचर चित्रपटांमध्येही मराठी मोहर बघायला मिळाली. नॉन फिचर फिल्म श्रेणीतील सामाजिक विषयावरील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'थ्री टू वन' या हिंदी आणि मराठी दोन्ही भाषेत असणाऱ्या चित्रपटला प्रदान करण्यात आला. 'थ्री टू वन' या सिनेमाची निर्मिती एफटीआयआय ची असून दिग्दर्शक हिमांशू प्रजापती यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप रजत कमल आणि प्रत्येकी ५०,००० हजार रूपये रोख आहे. 'रेखा' या मराठी नॉन फिचर फिल्मला विशेष परीक्षक श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला. या चित्रपटाचे दिग्दर्शन शेखर बापु रणखांबे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप रजत कमल आणि १ लाख रूपये रोख आहे.

एंडेन्जर्ड हेरिटेज वर्ली आर्टला सर्वोत्कृष्ट प्रमोशनल डॉक्युमेंटरी चित्रपटाचा पुरस्कार

एंडेन्जर्ड हेरिटेज वर्ली आर्ट या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट प्रमोशनल डॉक्युमेंटरी फिल्मचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या चित्रपटाचे दिग्दर्शक हेमंत वर्मा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप रजत कमळ व ५० हजार रोख असे आहे. वारली महाराष्ट्रातील एक जमात आहे, जी डहाणू आणि जव्हारच्या आसपासच्या भागात राहते. लग्नाच्या निमित्ताने हे लोक आपल्या घराच्या भिंतींना गेरूने प्लास्टर करतात आणि तांदळाच्या पिठाने चित्रे काढतात. या चित्रांवर आधारित हा चित्रपट आहे. याचे निर्माता, दिग्दर्शक, लेखक आणि संपादक हेमंत वर्मा आहेत. हेमंत वर्मा हे हरियाणातील भिवानी शहरातील रहिवासी असून गेल्या ३५ वर्षांपासून ते मुंबईत राहत आहेत.

वहिदा रेहमान 'दादासाहेब फाळके' यांना जीवनगौरव पुरस्कार

भारतीय चित्रपटसुष्टीला ६६ वर्षे दिलेल्या अतुलनीय योगदानबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रेहमान यांना ५३ व्या दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्काराने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ६९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

सहा दशकांच्या कारकिर्दीत वहिदा रेहमान यांनी ९० हून अधिक चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. प्यासा, कागज़ के फूल, चौदवी का चाँद , साहेब बीबी और गुलाम, गाईड, खामोशी आदी चित्रपटांमध्यील त्यांच्या भूमिकांचे समीक्षकांनी कौतुक केले. आपल्या अभिनय सामर्थ्यांच्या जोरावर त्यांनी अनेक पुरस्कार पटकावले आहेत. गाइड (१९६५) आणि कमलमधील (१९६८) भूमिकांसाठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कारही मिळाला आहे. रेश्मा आणि शेरा (१९७१) या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. वर्ष १९७२ मध्ये त्यांना पद्मश्री, तर वर्ष २०११ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. पुरस्काराचे स्वरूप स्वर्ण कमळ, रुपये १० लाख, शाल व प्रशस्ती पत्र असे आहे.

## टी.ए.पाटील स्कूल, पडघे मधील विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड

भिवंडी/मिलिंद जाधव : १२ ऑक्टोबर रोजी बी.एन.एन कॉलेज भिवंडी येथे,ठाणे जिल्हा ग्रामीण भिवंडी तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या क्रिकेट स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील ' टी.ए.पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल पडघे ' येथील १४ वर्षाखालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पहिल्या क्रमांकाने या क्रिकेट स्पर्धेत विजय मिळवला असून संघाची जिल्हा स्तरावर निवड करण्यात आली आहे. तर विजयी खेळाडूंचे शालेय मुख्याध्यापक,क्रीडा शिक्षक आणि इतर सर्व शिक्षकांच्या वतीने मनपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून,त्यांना जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# चालू गाळप हंगामात कारखाना ६ लाख मे. टन ऊसाचे गाळप : चेअरमन सिद्धाराम म्हेत्रे

## मातोश्री लक्ष्मी शुगरचा मंगळवारी अकरावा बॉयलर अग्नी प्रदीपन उत्साहात संपन्न

अक्क्लकोट/प्रतिनिधीः येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पदस्पर्शाने व वास्तव्याने पावन झालेल्या व आई तुळजाभवानीच्या अशिर्वादाने अक्कलकोट तालुक्यातील मातोश्री लक्ष्मी शुगर को जनरेशन इंडस्ट्रिज लिमिटेड कारखान्याचा अकरावा गळीत हंगाम शुभारंभ अक्कलकोट तालुक्याचे विकासरत्न तथा कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे व मॅनेजिंग डायरेक्टर शिवराज म्हेत्रे, शितल म्हेत्रे, बोरोटी सरपंच अशोक ढंगापुरे, सिध्दप्पा पुजारी (मिरजगी), इरण्णा करवीर - (रूद्देवाडी) व अक्कलकोट तालुक्यातील विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दिनांक १७ ऑक्टोबर रोजी अतिशय आनंदमय व चैतन्यमय वातावरणात पार पडला. अध्यक्षीय भाषणात कारखान्याचे चेअरमन सिध्दाराम म्हेत्रे यांनी चालू गाळप हंगामात कारखाना ६ लाख मे.टन ऊसाचे गाळप करणार असल्याचे सांगितले. त्यादृष्टिने आवश्यक असणारी ट्रक्स, ट्रॅक्टर्स, मिनी कार्ट, बैलगाडया व केन हार्वेस्टर अशी मोठया प्रमाणात यंत्रणा भरती केल्याचे सांगितले. नेहमीच तालुका व तालुक्यातील जनतेच्या विकासाचे ध्येय दृष्टिक्षेपात असल्याने व तालुक्यातील बेरोजगाराना रोजगारांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरीता यंदा ऊसतोडणीसाठी आवश्यक असणारी यंत्रणा ही जास्तीत जास्त स्थानिक व अक्कलकोट तालुक्यातील घेतली असल्याने तालुक्यातील असंख्य बेरोजगाराना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याचे सांगितले. या यंत्रणेमार्फत कारखाना गाळपासाठी आवश्यक असणा-या ऊसाचा पुरवठा केला जाणार आहे. कारखान्याच्याविकास वाटचालीत तालुक्यातील शेतकरी, ऊस उत्पादक व



कर्मचारी यांचा मोठा वाटा असल्याचेसांगितले. तसेच तालुक्यातील शेतक-याने आपला ऊस कारखान्यास गाळपास देऊन सहकार्यकरण्याचे आवाहन चेअरमन सिध्दाराम म्हेत्रे यांनी केले. सदर कार्यक्रमास कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर बाळासाहेब कुटे, जनरल मॅनेजर रावसाहेब गदादे, वर्क्स मॅनेजर कृष्णा एकतपुरे, केन हेड गुरुनाथ लोहार, डे. केनमॅनेजर सिद्राम गुरव, चिफ केमिस्ट माशेट्टी शिवपुत्र, ऊसविकास अधिकारी बाबुराव पाटील, चिफ अर्कोटट अंबादास बल्ला, एच. आर मॅनेजर मिलिंद शिरसे, परचेस ऑफीसर सचिन कुलकर्णी, आय. टी. मॅनेजर सोमशंकर कलमणी, स्टोअर किपर श्रीकांत लोहार,सुरक्षा अधिकारी शिवानंद निंबाळ, विश्वानाथ हडलगी, सर्व अधिकारी, खातेप्रमुख, कर्मचारी वअक्कलकोट तालुक्यातील शेतकरी बाधंवाची मोठी उपस्थिती होती.

# शहापूर तालुक्यातील राजकारण वेगळ्या वळणावर

## मा.आमदार पांडुरंग बरोरा स्वगृही परत?

शहापूर / प्रफुल्ल शेवाळे :राष्ट्रवादी चे माजी आमदार आणि सध्याचे शिवसेना नेते म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक पांडुरंग बरोरा पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस सोबत संसार थाटणार असल्याचे वृत्त आहे. पांडुरंग बरोरा लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्वसर्वा शरद पवार यांना भेटून पक्षात प्रवेश करणार आहेत. एका खाजगी वहिनीला दिलेल्या मुलाखती दरम्यान बरोरा यांनी हे वक्तव्य केलं आहे.. शहापूर चे माजी आमदार स्व. म. ना. बरोरा यांचे आणि शरद पवार यांचे गेल्या ४०वर्षाचे संबंध होते.. २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सोडून बरोरा हे शिवसेना पक्षात गेले.. आणि मागील वर्षी ते एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले.. परंतु आता राष्ट्रवादी पक्ष सोडून गेलो ती आपली एक प्रकारे चूक होती आणि आता तालुक्यातील जनतेची, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची माफी मागत आपण शरद पवार यांच्या सोबत जाणार आहोत असे वक्तव्य पांडुरंग बरोरा यांनी केलं आहे.. आता शहापूर तालुक्यातील राजकारण आता कोणतं निर्णायक वळण घेईल हे येणारा काळ ठरवेल .. असं चित्र दिसू लागलंय..



# अक्कलकोटचे माजी नगरसेवक उत्तम गायकवाड यांचे वंचित मध्ये प्रवेश



अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट तालुक्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आ ) जिल्हा उपाध्यक्ष व भाजप युतीचे नगरसेवक उत्तम गायकवाड यांचा मुंबई येथे आदरणीय बाळासाहेब आंबेडकर तसेच राज्याच्या अध्यक्षा रेखाताई ठाकूर जिल्हाध्यक्ष श्रीशैल गायकवाड यांच्या उपस्थितीत व पक्षाचे उपाध्यक्ष रवी थोरात सोलापूर शहराचे

अध्यक्ष प्रशांत गोणीवार जिल्हा संघटक बाबुराव सावंत यांच्या उपस्थितीत वंचित बहुजन आघाडी पक्षांमध्ये त्यांना प्रवेश देण्यात आला.

# उल्हासनगर मध्ये बुद्ध विहारात चोराने केले भंतेजीयांचे मोबाईल व रोकड चोरी

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर ३ सुभाष नगर येथील पंचशील बुद्ध विहारांमध्ये रात्री दोनच्या तीनच्या दरम्यान चोराने विहाराची खिडकीच्या आत प्रवेश करून भंतेजी ची झोपेत असताना चोराने यांचे मोबाईल रोकड रुपये आणि पिशवी सुद्धा त्याने घेऊन पसार झाला आहे सकाळी उठल्यानंतर भंतजी यांच्या लक्षात आले की विहारात चोरी झाले आहे त्यांनी तत्काळ स्थानिक. भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांना कळविले असता. त्यांनी भांतेजी यांना घेऊन मध्यवर्ती पोलीस स्टेशन या ठिकाणी तक्रार करण्यात आली पोलीस अधिकारी यांनी तत्काळ मोबाईलचे ट्रेक करण्याचे काम चालू करून आम्ही लवकरात लवकर चोराला पकडून त्याला शिक्षा करू सांगितले .यावेळी पत्रकार अशोक शिरसाट वंचित बहुजन आघाडीचे उल्हासनगर शहर उपाध्यक्ष बाळासाहेब अहिरे वंचित बहुजन आघाडी उल्हासनगर युवा अध्यक्ष भरत रणदिवे उल्हासनगर महासचिव रमेश गायकवाड प्राध्यापक प्रवीण माळवे उल्हास ढगे शंकर गायकवाड जनार्दन ढगे सुनिल जाधव रोशन पगारे व महिला पदाधिकारी यांनी पोलीस घटना लवकरात लवकर चोराला पकडून त्याला शिक्षा झाली पाहिजे असे सांगितले पुठील तपास पोलिस यंत्रणा करत आहे.



# हन्नूर च्या अनंत चैतन्य प्रशालेत नारी शक्तीचा सन्मान



अक्कलकोट/प्रतिनिधी : सगळीकडे सुरू असलेल्या नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून आदीशक्ती चे स्वरूप असलेल्या , विविध अवतार धारण करून असूरशक्तीचा नायनाट केलेल्या अशा देवीच्या विभिन्न रूपात पाहिली जाणारी स्त्री केवळ स्त्री,महिला,नारी नसून ती मुलगी,पत्नी,आई,बहीण,अशा विविध भुमिका अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडणारी ,एरवी हळूवार मनाची, माया -ममता, करुणा, दयेचा सागर असलेली नारी, प्रसंगी कठोर बनून ती कधी, दुर्गा तर कधी काली बनते,आजची नारी ही अबला नसून ती सबला आहे

हे आज प्रत्येक पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंबहूना त्याहूनही अधिक काम करून तिने सिद्ध केले आहे.आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे स्त्री चा वावर नाही अशा या नारी शक्तीचा सन्मान करणे, तिचे संरक्षण करणे, तिला आणखी स्वावलंबी बनवणे गरजेचे असल्याने संस्थेच्या जेष्ठ संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांच्या संकल्पनेतून साकारलेले नारी देशाचा अभिमान- नारी शक्तीचा सन्मान या उपक्रमाच्या अनुषंगाने आज मंगळवार दिनांक १७ ऑक्टोबर रोजी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे नारी शक्तीचा सन्मान हा कार्यक्रम संस्थेच्या जेष्ठ मार्गदर्शिका सौ. स्वरुपाकाकू सिद्धप्पा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पार पडला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय श्री. पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पुजन सौ. स्वरुपाकाकू कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हन्नूर गावच्या प्रथम नागरिक सौ. सोनालीताई तळवार, ग्रामपंचायत सदस्या सौ. जयश्री भरमशेट्टी, सौ. मुक्ताबाई ढगे, सौ.गौराबाई भरमशेट्टी ,प्रशालेच्या जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी,सौ.मल्लम्मा चप्पळगाव,सौ.स्वप्नाली जमदाडे,सेमी विभागाच्या शिक्षिका सौ.रुपाली सुरवसे,कु.लक्ष्मी तळवार ,सेविका श्रीमती नागिणी साठे उपस्थित होते.यानंतर सौ. स्वरुपाकाकू कल्याणशेट्टी यांचा शाल,पुष्पगुच्छ देऊन प्रशालेच्या प्रवेश, क्षेत्रभेट व सहलविभागाच्या प्रमुख सौ.मृदुलादेवी स्वामी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले तर सरपंच सौ. सोनालीताई तळवार यांचा सत्कार प्रशालेच्या शिष्यवृत्ती परीक्षा विभाग प्रमुख सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर उपस्थित सर्व ग्रामपंचायत महिला सदस्यां, माध्यमिक व सेमी विभागाच्या सर्व शिक्षिका,सेविका यांचा सन्मान गुलाब पुष्प देऊन सौ. स्वरुपाकाकू कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.अशोक साखरे सर यांनी नवरात्र व माता पार्वती याचे साधर्म्य व विविध रूपे याविषयी माहिती सांगून कार्यक्रमा मागचा हेतू स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मल्लम्मा चप्पळगाव मॅडम यांनी केले तर आभार सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी मानले. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे सर, जेष्ठ शिक्षक ज्ञानदेव शिंदे सर, छायाचित्र विभाग प्रमुख श्री.धनंजय जोजन सर, समस्त प्राध्यापक,शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

# म्हेत्रे नगर गट नं ७०८ मधील अतिक्रमण कारवाई स्थगित बाबत रिपाईचे तहसिलदार यांना निवेदन




अक्कलकोट/प्रतिनिधी :रिपाइं आठवले गटाच्या वतीने म्हेत्रे नगर गट नं ७०८ मधील अतिक्रमण कारवाई स्थगित करण्यासाठी अक्कलकोटचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. अक्कलकोट ग्रामीण येथिल गट नंबर ७०८ मधिल म्हेत्रे नगर येथे अनेक वर्षांपासून नागरिक राहतात त्या ठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने अनेक सोयी सुविधा देखील पुरवण्यात आल्या आहेत उदाहरणार्थ गटारी, लाईट, सार्वजनिक शौचालय अशा सार्वजनिक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. अक्कलकोट नगरपरिषदेला ते घराचा टॅक्स देखील भरत आहे, नळाचा टॅक्स देखील भरत आहे असे सर्व टॅक्स भरत असताना व त्यांची घरं नियमात असताना त्यांना शासनाकडून अतिक्रमणाच्या नावाखाली घर पाडण्याची नोटीस वजा सुचना देने हे न्यायाला धरून नसून या गोष्टीचा तीव्र निषेध रिपाइं च्या वतीने करण्यात आला व सध्याला दसरा व दिवाळी सण असल्याने शासनाने अतिक्रमण मोहीम राबवून लोकांच्या सणाच्या आनंदात विरजण घालण्याचे काम करू नये. अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने आमरण उपोषणाचा इशारा रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिला. यावेळी रिपाइं अक्कलकोट शहर अध्यक्ष अजय मुकणार, प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अमर शिरसाट, रिपाइं शहर कार्याध्यक्ष सचिन बनसोडे, रिपाइं शहर उपाध्यक्ष सुरेश गायकवाड , दस्तगीर मुजावर,हमिद शेख, नुरदिन शेख,अयाज चंदनवाले, नागू कुंभार,नजिर बागवान,राजू पवार,शिवम्मा कुंभार, फरजाना गंवडी,खाजाभाई बागवान,अजिम बागवान यांच्यासह म्हेत्रे नगरमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मानवमुक्तीसाठी बाबासाहेबांची धम्म क्रांती : प्रा.डी.डी.मस्के

वागदरी/एस.के.गायकवाड : अंधश्रद्धा, कर्मकांड याला फाटा देऊन आनंदाने सुखी जिवन जगण्याकरीता दि.१४ आँक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दिक्षा भूमीवर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो आनुयायासह हिंदू धर्माचा त्याग करून वैज्ञानिक दृष्टीकोण असलेला मानवतावादी बौद्ध धम्माचा स्विकार केला असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर म्हणजे जागतिक पातळीवर अंधश्रद्धा, कर्मकांडातून मानवमुक्तीसाठी केलेली धम्म क्रांती होय.असे प्रतिपादन प्रा.डी.डी.मस्के (बार्शी) यांनी अणदूर ता.तुळजापूर येथे बोलताना केले.

अणदूर येथे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, फुले आंबेडकर विद्वत्त महासभा, वंचित बहुजन आघाडी धाराशिव जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने ६७ व्या धम्म चक्रप्रिर्वतं दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

प्रारंभी येथील संजीवनी सामाजिक संस्थेचे संस्थापक तथा उपसरपंच नागनाथ कुंभार व पंचायत समिती माजी सदस्य साहेबराव घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी समता सैनिक दलांच्या वतीने ध्वजास मानवंदना देण्यात आली .नंतर लगेचच नळदुर्ग येथील अमरदीप लेझीम संघाने उत्कृष्ट लेझीम खेळून उपस्थित जनसमुदायांची मने जिंकली. त्यानंतर फुले आंबेडकर विव्दत महासभेचे पश्चिम महाराष्ट्र समन्वयक सिध्दार्थ जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवरांचा सत्कार व जाहीर सभेचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डी.डी.मस्के बोलत होते.याप्रसंगी कैलास जयवंतराव गवळी गुरुजी यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक तथा वंचितबहुजन आघाडीचे जिल्हा सहसचिव आर.एस गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचलन गोविंद भंडारे यांनी केले.

लागलीच दुपारच्या सत्रात सोलापूर येथील सुप्रसिद्ध गायक हार्मोनियम मास्टर विठ्ठल आण्णा बनसोडे,रोहित भडकवाड (अनगरकर),ऋतुजा भालेराव,युट्युब स्टार महेश कांबळे सोलापूरकर,किशोर शिंदे सोलापूरकर,भिम शाहीर धनराज तुपसाखरे,विजय बनसोडे, यल्लाप्पा दुपारगुडे,नागनाथ दुपारगुडे,गजेंद्र दुपार गुडे राम वाघमारे,यशवंत कांबळे चंद्रकांत शिंदे (सिंदगाव),अंकुश लोखंडे,हरिदास कांबळे,यांच्यासह परिसरातील भिम शाहिरांचा समाज प्रबोधनपर भीम



गीताचा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी क्रषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूरचे संचालक अँड. रामचंद्र ढवळे,परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे,रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक एस.के.गायकवाड,माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर,भिमराव गायकवाड, लहु गायकवाड (लोहार), वंचित बहुजन आघाडीचे आशिष लोंढे,अंकुल वाघमारे,विनायक दुपारगुडे पत्रकार राजा स्वामी,गुरुनाथ गायकवाड,महाळप्पा गळाकाटे,राजेश देवसिंगकर अनिल बागडे,आदिनाथ बागडे,आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम नागविले,मल्लिनाथ जाधव,महेश बागडे,लक्ष्मण सुरवशे,सोमनाथ कांबळे, संजय गवळी,सिद्धेश्वर सूर्यवंशी,विजय मुकरे, शाहूराज सूर्यवंशी,राजेंद्र चोकोबा सुरवसे,संतोष कांबळे,आदी सह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी अणदूर व परिसरातील कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# पुण्यातील भिडे वाड्यासंदर्भातील न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत; क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या स्मारक उभारणीचा मार्ग मोकळा

## भिडे वाड्यातील राष्ट्रीय स्मारक जगभरातील महिला सशक्तीकरणाच्या चळवळीला प्रेरणा देईल : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने पुण्यातील ज्या भिडे वाड्यात महिला शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली, त्या भिडे वाड्यासंदर्भात त्या जागेत असणाऱ्या पोटभाडेकरुंची जागेसंदर्भातील याचिका मुंबई उच्च न्यायालयाने आज फेटाळत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. त्यामुळे भिडे वाड्यात राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा राज्य सरकारचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचे मी स्वागत करतो. ऐन नवरात्रोत्सवातच न्यायालयाने हा निकाल दिल्याने महिला सशक्तीकरणाच्या चळवळीला खऱ्या अर्थाने बळकटी मिळणार असून भिडे वाड्यात उभारण्यात येणारे राष्ट्रीय स्मारक जगभरातील महिला सशक्तीकरणाच्या चळवळीला प्रेरणा, प्रोत्साहन, बळ देईल, अशी प्रतिक्रीया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने पुण्यातील भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरु करुन महिला शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. त्यामुळे देशाला महिला शिक्षणाचा विचार व दिशा मिळाली. ज्या भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरु झाली, त्या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक उभारण्याची राज्य सरकारची अनेक वर्षापासूनची योजना होती. त्या जागेबाबत तेथील पोटभाडेकरुने न्यायालयात याचिका दाखल केल्यामुळे या स्मारकाचे काम रखडले होते. गेल्या अनेक वर्षापासून या न्यायालयीन लढ्यात



अनेक जण सक्रीय सहभागी होते, या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठीच्या लढ्याचा मी देखील साक्षीदार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने पोटभाडेकरुची याचीका फेटाळून ऐतिहासिक निर्णय दिला आहे. न्यायालयाच्या या निकालामुळे भिडे वाड्यात उभारण्यात येणाऱ्या राष्ट्रीय स्मारकाचा मार्ग मोकळा झाला आहे. या ठिकाणी फुले दाम्पत्याच्या कार्याला साजेसे भव्य राष्ट्रीय स्मारक राज्य सरकारच्यावतीने उभारले जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

# वागदरीत येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सार्वजनिक वाचनालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहाने साजरा

वागदरी/प्रतिनिधी : स्वातंत्र्यवीर सावरकर सार्वजनिक वाचनालय येथे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाइल मॅन, थोर वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो त्याप्रसंगी खालील मान्यवर उपस्थीत होते सर्वश्री शिवपूत्र शिरगण ,कोटप्पा कोटे, सरदार हंचाटे, पुजारी शिवशंकर, श्रीकांत सोनकवडे , पंचाक्षरी परमेश्वर', कलशेट्टी मुन्ना, हुग्गे, सुरेष छुरे, सोनकवडे व ग्रंथालय कर्मचारी व वाचक सभासद ऊपस्थीत होते.

# जातियवादी दिलीप जाधव याच्यावर तात्काळ कार्यवाही करा : बौद्ध अनुयायांची मागणी




कळंब: प्रतिनिधी, दिलीप जाधव चेरेकर, नामक जातीयवादी हरामखोर याने बौद्ध महिला विषयी अत्यंत घाणेरडे,व अश्लील भाषेत जातीवाचक व समाज विघातक घाणेरड्या भाषेचा वापर करून दोन समाजातील तेड निर्माण करणारे वक्तव्य सोशल मीडियावर, इंस्टाग्राम, फेसबुक, वर व्हायरल केल्यामुळे आमच्या भावना दुखावल्या असून त्याच्यामागे नेमका कोणाचा हात आहे हे शोधून काढून त्याच्यावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी कळंब

तालुक्यातील आंबेडकर प्रेमी नागरिकांच्या वतीने दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ रोजी पोलीस निरीक्षक- सुरेश साबळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे. त्या निवेदनात अनिल हजारे, सतपाल बनसोडे, राहुल हौसलमल, शिवाजी शिरसाठ, बजरंग ताटे, कुणाल मस्के, अभिजीत हौसलमल, राजाभाऊ टोपे, प्रवीण देशमाने, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी चेअरमन अभिजीत पाटील यांचे मोठ योगदान

## कार्यकर्त्यांना सभेला जाण्यासाठी शेकडो वाहने अन् रस्त्यात अल्पोपहाराची केली होती सोय

पंढरपूर/प्रतिनीधी : मराठा समाजाच्या आरक्षण संदर्भात मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे भव्य सभा आयोजीत केली होती. त्या सभेसाठी पंढरपूर आणि मंगळवेढा भागातून हजारो कार्यकर्ते गेले होते. त्या कार्यकर्त्यांना लागणाऱ्या वाहनासाठी डिझेलची व्यवस्था धाराशिव (उस्मानाबाद) येथील धाराशिव साखर कारखान्यावर आणि हजारो कार्यकर्त्यांच्या अल्पोपहराचीही व्यवस्था विठ्ठलचे चेअरमन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्याचे धाडशी नेते अभिजीत पाटील यांनी केली होती.

चेअरमन अभिजीत पाटील यांच्यावतीने धाराशिव साखर कारखाना येथे अंतरवली सराटी येथील मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी या भागातून जाणाऱ्या जवळपास ५०हजार कार्यकर्त्यांना चहा नास्था ची सोय करून दिली होती. पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील जवळपास ५३५ गाड्यांना डिझेल टाकून देण्याची भूमिकाही मराठा समाजाचा प्रतिनीधी म्हणून केली आहे. त्यामुळे पंढरपूर आणि मंगळवेढा भागातील



मराठा समाजातून अभिजीत पाटील यांचे नाव प्राधान्याने घेतले जात आहे. मागील काही वर्षापासून उद्योजक अभिजीत पाटील यांनी समाजकारण करत असताना आता थेट राजकारणात उडी घेतली आहे. त्यांच्याकडे दानत असल्याने राजकारणातही त्यांना मोठ्या प्रमाणात यश येत आहे. मागिल काही वर्षांपासून कोणत्याही सामाजिक कार्यात सढळ हाताने मदत करण्याचे कार्य जोमाने सुरू आहे.

प्रत्येक समाजाच्या विविध कार्यक्रमासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन विविध कार्यक्रम भरवून जनमानसात अभिजीत पाटील यांची प्रतिमा उंचावली आहे. त्याचा फायदा त्यांना आगामी काळात नक्की होणार आहे. हे मात्र नक्की झाले आहे.

# शिक्षण विभागाच्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते उद्घाटन



पुणे : सामाजिक उत्तर दायित्व निधीचा उपयोग अनेक शाळांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी यापूर्वीही करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर 'अडॉप्ट अ स्कूल' हा निर्णय केवळ शाळांमधील पायाभूत, शैक्षणिक सुविधांचा विकास करण्यासाठीच घेतलेला असून खासगीकरणाचा यात कोणताही संबंध नाही, असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणाले.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे 'उल्लास- नव भारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत क्षेत्रीय अधिकारीऱ्यांची राज्यस्तरीय कार्यशाळा आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे उद्घाटन शिक्षण मंत्री श्री. केसरकर यांच्याहस्ते झाले.

कार्यक्रमास शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक अमोल येडगे, शिक्षण विभागाचे सहसचिव इम्तियाज काझी, योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदकुमार बेडसे, राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालक संपत सूर्यवंशी आदी उपस्थित होते.श्री. केसरकर म्हणाले, आपल्याकडे चांगल्या प्रकारची शिक्षणपद्धती असताना ऑनलाईन नोंदीमध्ये कमी पडल्यामुळे परफॉर्मन्स ग्रेडींग इंडेक्समध्ये (पीजीआय) आपण दुसऱ्या स्थानावरुन सातव्या स्थानावर घसरलो आहोत. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत. सर्व मंडळांच्या शिक्षणपद्धतींचे एकत्रीकरण करुन राज्यासाठी आदर्श शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम तयार करावा, असेही ते म्हणाले.

**नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसाय शिक्षणावर भर**

शिक्षणाकडे उद्याची पिढी घडविण्याचे साधन म्हणून पहावे. शिक्षण हे पाठांतराचे नव्हे तर समजून घेण्याचे शास्त्र आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार एससीईआरटी तयार करत असलेल्या अभ्यासक्रमात जे सर्वोत्कृष्ट आहे ते समाविष्ट करावे, परंतु त्यानंतर त्यात वारंवार बदलाचे प्रयोगही केले जाऊ नयेत. मुलांना श्रमाचे महत्व लक्षात यावे यासाठी नवीन धोरणात कृषी शिक्षणाचा, स्काऊट गाईडचा समावेश केला आहे. व्यवसाय शिक्षण, कृषी शिक्षण प्राथमिक स्तरावरुनच सुरू झाले पाहिजे.

**मुलांचे पुस्तकांचे ओझे कमी व्हावे**

शासनाने केलेल्या प्रयत्नांची शाळास्तरावर प्रभावी अंमलबजावणीकडे शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. शिक्षण विभागात, शाळांमध्ये सर्व माहितीचे संगणकीकरण व सॉफ्टवेअरद्वारे जोडणी झाल्यास त्यावरील वेळ वाचून तो मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी देता येईल. पुढील काळात मुलांची हजेरीदेखील स्वयंचलित पद्धतीने होईल, मुलांच्या परीक्षांचे निकालही काही सेकंदात ऑनलाईनरित्या पाहता येतील असे तंत्रज्ञानही विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

प्रत्यक्ष शाळेतील शिक्षणाला पर्याय नाही. त्याला तंत्रज्ञानाचीही जोड देता येईल. शिक्षकांचे ज्ञान वेळोवेळी अद्ययावत व्हावे यासाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांच्या बळकटीकरणावरही भर देण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

**नवभारत साक्षरता कार्यक्रमाकडे आपली जबाबदारी म्हणून पहा**

नवभारत साक्षरता कार्यक्रम हा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून याच्या अंमलबजावणीसाठी शाळा याच केंद्रबिंदू आहेत. नवीसाक्षरांना आठवीतील विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा समकक्ष न्यायचे असून ही शिक्षणाची जबाबदारी शिक्षकांचीच आहे. त्यामुळे राज्यात हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करा, असेही मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले.

यावेळी श्री. देओल म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात मुला- मुलींच्या एकत्रित शिक्षणावर भर देण्यात येत आहे. कमी पटसंख्या असलेल्या शाळांपेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांतील मुले जास्त चांगल्याप्रकारे ज्ञान ग्रहण करत असल्याचे दिसते. समूह शाळासारखे प्रयोग उपयुक्त ठरल्याचे यातून दिसून आले आहे. मात्र कोणत्याही शाळा बंद करण्याचे धोरण नाही. पीजीआय मानांकनामध्ये १० वी मधले गुण, निकालही ग्राह्य धरण्यात येत असल्यामुळे खासगी अनुदानित शाळातील शिक्षणाकडेही शिक्षणाधिकाऱ्यांना लक्ष द्यावे लागेल. शाळांमध्ये पिरीऑडिक असेसमेंट टेस्ट सुरू करण्यात येणार असून खासगी अनुदानित शाळांमध्येही पुढील महिन्यापासून या परीक्षा घेण्यास सुरुवात होईल, असेही श्री. देओल म्हणाले.

शिक्षण आयुक्त श्री. मांढरे म्हणाले, राज्यात सुमारे १ कोटी ६३ लाख निरक्षरांची संख्या असून गावांमधील १० टक्के नागरिक निरक्षर असल्याचे दिसून आले. फक्त शालेय विद्यार्थीच नव्हे तर सर्वच समाजघटकांना शिक्षण देण्याची शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. या कार्यक्रमाला व्यावसायिकतेची जोड देण्यात आली असून नवभारत साक्षरता अभियानाकडे प्राधान्यक्रमाचा कार्यक्रम म्हणून पहावे, असेही ते म्हणाले.

डॉ. पालकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बालभारतीच्या 'शिक्षण गाथा' या त्रैमासिकाचे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वार्षिक अंकाचे, निपुण भारत अंतर्गत गुणवत्ता वृद्धीविषयक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यशाळेत सर्व विभागीय उपसंचालक, जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आदी उपस्थित होते.

# नवरात्रीनिमीत्त वटवृक्ष मंदिरात देवी महात्म्य पोथी पारायण सेवेचे आयोजन

## देवस्थानचे विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्त्याखाली संपन्न होणार पारायण



अक्कलकोट/प्रतिनिधी : नवरात्र महोत्सवानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील ज्योतीबा मंडपात सालाबादाप्रमाणे यंदाही ३ दिवसीय देवी महात्म्य पारायण सेवेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. पुढे बोलताना इंगळे यांनी देवस्थानचे विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्त्याखाली गुरूवार दि.१९ ऑक्टोबर ते शनिवार दि.२१ ऑक्टोबर अखेर सकाळी ८ : ३० ते ११ या वेळेत ही देवी महात्म्य पोथीची पारायण सेवा संपन्न होईल.गुरुवार दि.१९ रोजी पारायण सेवेपुर्वी कुंकूमार्चन होवून पारायण सेवेस प्रारंभ होईल. या देवी महात्म्य पारायण सेवेत दरवर्षी अनेक महिला देवी भक्त माता भगिनी सहभागी होवून या सेवेचा लाभ घेतात. मंदिर समितीच्या विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्त्याखाली गेल्या ३१ वर्षांपासून दरवर्षी ही पारायणसेवा अखंडपणे देवीच्या चरणी समर्पित होत आहे. सालाबादा प्रमाणे यंदाही या उत्सवात व पारायण सेवेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून स्त्रीशक्तीचा सन्मान वाढवावा असे आवाहन इंगळे यांनी यावेळी केले आहे.



# समतानगर मराठी शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा

भिवंडी/प्रतिनिधीः डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १६ ऑक्टोंबर २०२३ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर मराठी शाळेत ''लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट व जि.प. समतानगर मराठी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची विद्यार्थ्यांना माहिती देत वाचन संस्कृती वाढली पाहीजे त्या आधारित कविता सादर करीत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे असे सांगत.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची माहिती मुखाध्यापिका मिना शेंडे व सहशिक्षिका भावना घरत यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कार्डचे वाचन केले. व पोस्टर दाखवत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

# पळवा येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

ठाणे/मिलिंद जाधव : तथागत बौध्द सामाजिक संस्था , पलावा आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिन १४ ऑक्टोबर २०२३ रोजी अमेझॉन क्लस्टर हॉल, कासा रिओ, पलावा येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन भंते महेंद्र बोधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बुद्धवंदना घेऊन महाकारुणी गौतम बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. भंते महेंद्र बोधी यांनी धम्मदेसना दिली असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची माहिती देत,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला बौद्ध धम्म आपण नेहमीच आचरणात आणला पाहिजे असे भंते महेंद्र बोधी बोलताना सांगितले. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या असून विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके वाटप करण्यात आली. यावेळी पलावा येथिल नागरिक उपस्थित होते.

